# भक्तिसागर

डॉ. शैलजा गुरुनाथ मुंगळे,
कोल्हापूर

ज्ञान, भक्ति, ध्यान, वैराग्याचा मागोवा म्हणजेच भक्तिसागर. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास आणि इतर संतमांदियाळींनी सांगितलेले ज्ञान किंवा त्यांच्या विचारांचे भांडार एवढे मोठे आहे की, त्याची आपण कशाशीही तुलना करू शकत नाही. आपल्या ज्ञानभांडारातूनच त्यांनी जगाला अतिशय मोलाचे विचार दिले. ज्ञान, भक्ती, ध्यान, आणि वैराग्य म्हणजेच जणू तीन भाऊ आणि एक बहीण असल्यासारखे एकमेकांचे पाठीराखे आहेत.

ज्ञान म्हणजे जे स्वत:ला आकलन होते आणि ज्याचे सर्व व्यवहार अध्यात्म चालवते असे आणि दुसऱ्यापर्यंत वाणीने जे पोहोचविले जाते व त्याचा आत्म्यापर्यंत बोध होतो, जे जीवनाशी निगडीत आहे आणि ज्यामुळे भक्ती, ध्यान, वैराग्य यांचा पाया भक्कम होतो असे ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. सर्वांतले पूर्ण ज्ञान असणे केव्हाही फायद्याचे आहे. अर्धवट ज्ञानाने फलित न होता त्रास होतो. त्यामुळे ज्ञान या शब्दाला फारच मोलाचा अर्थ आहे. ज्ञानाने सर्व काही साधता येते. पूर्ण ज्ञानातूनच भक्तीचा जन्म होतो.

भक्ती करायलासुद्धा ज्ञानाचे अधिष्ठान असावे लागते. भोळ्याभाबड्या भक्तालासुद्धा ज्ञान लागते. अनुभव लागतो; म्हणूनच एके ठिकाणी म्हटले आहे,

'हरिभजनावीण काळ घालवू नको रे'
अनुभवावीण मान डोलवू नको रे'।।

भक्ती दृढ होण्यासाठी भाव व भावासाठी, अनुभव येण्यासाठी माणसाला कुठेतरी श्रद्धा ही ठेवावी लागते. माणसाचे जीवन पूर्णत: फलित होण्यास श्रद्धा कामी येते. "ज्याचा जैसा भाव तैसा देवा त्याला पाव" म्हटले आहे. ज्याच्या त्याच्या भावाप्रमाणे त्याची श्रद्धा व त्याचे कर्म फळ देत असते. म्हणून माणसाने श्रद्धेने व भक्तीने आपले काम केले तर, त्याचे फळ आपोआपच चालून येते.

भक्ती करीत असताना जसजशी भक्ती वाढेल तसतसा ध्यानाकडे माणसाचा कल लागतो. अट्टाहास, नेम आणि वेळ यात समतोल ठेवला की, ध्यानास बसण्याची इच्छा होते. मग ध्यानात माणूस इतका रममाण होतो की, त्यात त्याला नवनवीन अनुभव येतात. एक प्रकारे कुंडलिनी शक्ती प्रकट होऊन त्याला डोल येऊ लागतो. आणि त्यात जास्त रममाण होऊन त्यातून त्याला बाहेरच्या जगात यावेसे वाटत नाही. आपल्याला फार मोठी सोन्याची खाण सापडल्याचा आनंद होतो; पण ध्यानातसुद्धा तोल ठेवावा लागतो. फार खोलवर जाऊन पण चालत नाही. ध्यानात सुंदर स्थळांची, दैवतांची, पर्वतांची व विशिष्ट स्थळांची दर्शने होत असतात; पण आपण फक्त महाराजांचे चरण आणि त्यांची जवळिक कशी साधता येईल एवढेच बघायचे. जसजसे ध्यान वाढत जाईल तसतसे अनुभव येतात. पुढे पुढे तर काही काहीच नकोसे होते. कशातच मन रमत नाही. नाम आणि ध्यान दोन्ही एकत्र गुंतले की, त्यातूनच वैराग्याचा जन्म होतो. लोकसंग्रह, कळकळ असावी; पण समाजात किंवा लोकांत मिसळू नये. मग माणूस खऱ्या अर्थाने एकांताचा वास धरतो, त्याला कशाचे काहीच वाटेनासे होते. तो जास्तीत जास्त अंतर्मुख होतो. आणि पूर्णत: तो एकाकी बनतो. त्याचे मन कोठेही व कशातही रमत नाही. प्रपंचापासून तो पूर्ण अलिप्त राहावयास बघतो. परंतु तसे न होऊ देता नाम त्याला परत प्रपंच्यात खेचून आणते. अशा या चारी नद्यांच्या, ज्ञानगंगेच्या महासागरात आनंदाने डुंबण्यास कोणाला नको असते? असा हा भक्तीचा महासागरच सर्वांचे जीवन उध्दरू शकतो. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते।। आनंदाचे डोही आनंद तरंग।।

■■■

*"शरीरपिंजरा आणि प्राण यांचा साक्षी मी गगन आहे. मी मुखाबाहेर व अंतरी परिपूर्ण व्यापून उरलो आहे. रक्त मेंदूसहित प्राण ज्या आकाशात लीन होतात तेच (आकाश) मी. मग मला जाणेयेणे कैचे ? मी आकाश म्हणजे पोकळीरूपाहून निराळा, शुद्ध निरंजन आनंदाचा कंद असताना, कळणें न कळणें याचा अभिमान वागेंद्रियावाचून मजला कोठून येईल ?"*